**जिल्ह्याच्या बचतगटांना ग्रामविकास मंत्री पंकजा मुंडेनी दिली भेट**

**अतिरिक्त महालक्ष्मी सरस प्रदर्शनात अमृतवेल आणि विकास बचतगटांचा समावेश**

**ठाणे दि २२ ऑगस्ट २०१९ :** नवी मुंबईच्या आगरी कोळी भवन येथे २१ ऑगस्ट पासून सुरु झालेल्या अतिरिक्त महालक्ष्मी सरस प्रदर्शनात ठाणे जिल्ह्यातील विकास स्वयं सहाय्यता बचत गट आणि अमृतवेळ बचतगटांना सहभागी होण्याची संधी मिळाली आहे. राज्याच्या ग्रामविकास मंत्री पंकजा मुंडे यांच्या हस्ते या प्रदर्शनाचे उद्घाटन झाले. यावेळी मुंडे यांच्यासह उपा आयुक्त आस्थापना सुप्रभा अगरवाल, जिल्हा परिषद ठाण्याच्या प्रकल्प संचालक डॉ. रुपाली सातपुते आदि मान्यवरांनी जिल्ह्यातील या दोन्ही बचतगटांच्या स्टॉलला भेट दिली.

हे प्रदर्शन पाहण्यासाठी येणारे नागरिक या दोन्ही स्टॉलवर भेट देत असून उत्तम प्रतिसाद मिळत आहे. अंबरनाथच्या हाजीमलंगवाडी येथील हे बचतगट असून विकास स्वयं सहाय्यता बचतगटाने विक्रीसाठी मसाला, कुरडई, पापड आदि वस्तू आणल्या आहेत. तर अमृतवेल बचतगटाने बाटीक प्रिंटचे कपडे विक्रीसाठी आणले आहेत. ३१ ऑगस्ट पर्यंत सुरु असणाऱ्या प्रदर्शनात ग्रामीण विकास यंत्रणा जिल्हा परिषद ठाणेच्या टीमचा सक्रीय सहभाग असल्याचे महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवन उन्नती अभियानाच्या जिल्हा व्यवस्थापक सारिका भोसले यांनी सांगितले.






